REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 4 | JANUARY - 2026

‘मीठभाकरी’: कृषी व ग्रामजीवनाचा प्रामाणिक आविष्कार

डॉ. कैलास अंभुरे
संचालक, विद्यार्थी विकास/मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

सारांश (Abstract):

ग. ल. ठोकळ यांचा ‘मीठभाकरी’ (१९३८) हा कवितासंग्रह मराठी ग्रामीण कवितेतील एक महत्त्वाचा कवितासंग्रह असून, त्यात कृषी आणि ग्रामजीवनाच्या प्रामाणिक आविष्काराचा सखोल वेध घेतला आहे. तत्कालीन काळातील प्रचलित असलेल्या रविकिरण मंडळाच्या वरवरच्या आणि कल्पित जानपद कवितेला छेद देत, ठोकळांनी शेतकऱ्यांचे अपार कष्ट, सावकारी पाशातील शोषण, मजुरांची हतबलता आणि खेड्यातील अस्सल जीवन वास्तववादी पद्धतीने मांडले. या संग्रहात केवळ गरिबीचे चित्रण नाही, तर संयत ग्रामीण प्रेमभावना, स्त्रीविषयीचा आदर आणि निसर्गाशी जोडलेली नाळही व्यक्त झाली आहे. बोलीभाषा व प्रमाणभाषेचा सुरेख संगम, विविध वृत्तांचा वापर आणि 'सुनीता' या नव्या काव्यप्रकाराची निर्मिती, यामुळे हा संग्रह काव्यशास्त्रीय आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत मोलाचा ठरतो.

मुख्यशब्द (Keywords): ग. ल. ठोकळ, मीठभाकरी, ग्रामीण कविता, ग्रामजीवन आणि कृषी संस्कृती, वास्तववाद, जानपद गीते, शेतकरी-मजूर शोषण, ग्रामीण कविता, ग्रामीण साहित्य इ.

१९२० हे वर्ष भारतीय राजकारण व समाजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. एकतर, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत लोकमान्य टिळक यांचा अस्त झाला आणि महात्मा गांधी यांचा उदय झाला. लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रातील अर्थात मराठी तर महात्मा गांधी गुजरातमधील. म्हणजेच स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व मराठी माणसाकडून गुजराती माणसाकडे गेले असले तरी याच वर्षी भारतीय समाजकारणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘मूकनायक’च्या रूपाने पाऊल टाकले. गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीला खेड्यातील माणसाभोवती केंद्रीभूत केले. त्यांनी खरा भारत देश खेड्यातच असल्याचे सांगत ग्रामोद्धाराची संकल्पना मांडली आणि प्रत्यक्ष ग्रामोद्धाराला प्रारंभ केला, तर दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्योद्धारास आरंभ केला. या दोन्ही कृतींचा मराठी साहित्यावर परिणाम झाला. गांधीजींनी सर्वांचे लक्ष खेड्याकडे वेधल्यामुळे खेड्यापाड्यातील जीवन साहित्यात यायला लागले. तद्वतच डॉ. बाबासाहेबांमुळे गावकुसाबाहेरच्या जीवनाकडे

साहित्यिकांचे लक्ष वेधले गेले आणि मराठीमध्ये ग्रामीण व दलित साहित्य प्रवाह सुरू झाले. पुढे १९२३ मध्ये पुण्यात 'रविकिरण मंडळा'ची स्थापना झाली. या मंडळातील कवींनीसुद्धा सहेतुकपणे ग्रामीण जीवन साहित्यात आणले. १९२५ मध्ये एकीकीडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आणि कानपूर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली तर दुसरीकडे भारतात पहिली इलेक्ट्रिक ट्रेन धावली आणि केरळमधील वैकोम सत्याग्रह यशस्वी होऊन सर्व जातीच्या लोकांना मंदिर प्रवेश मिळाला. या सर्व घडामोडींचे शतकानंतर आजही परिणाम दिसून येतात. असो!

साधारणत: रविकिरण मंडळाचा सूर्य मराठी कवितेत चांगलाच तळपत होता. या मंडळातील कवी गिरीष, यशवंत यांच्या जानपद कवितेने मराठी रसिकांना भुरळ घातली होती. परंतु ही कविता खूप वरवरची होती. यामुळे बालपण खेड्यात गेलेला गजानन ठोकळ हा कवी लिहू लागतो. ही कविता लोकप्रिय होते. सोबतच ना. घ. देशपांडे यांच्या जानपद गीतालाही लोकप्रियता मिळते. एकूणच तत्कालीन रसिकांवर जानपद गीतांचा प्रभाव असल्याने ग. ल. ठोकळ यांनी अखिल महाराष्ट्रातील आधुनिक मराठी कवींच्या जानपद गीतांचा 'सुगी' हा कवितासंग्रह १९३३ मध्ये प्रकाशित केला. यामध्ये ३५ कवींच्या स्फुट कविता संकलित आहेत. यापूर्वी मराठी कवितेत ग्रामीण जीवनाचे चित्रण आले नव्हते, असे नाही. तर महात्मा फुले यांनी 'अखंड'द्वारे बहुजन समाजाला जागे करण्याचे काम केले. 'अंखड'द्वारे म. फुलेंनी प्रामुख्याने कर्मकांड, जातीविषमता, लुबाडणूक, अप्रगतीची कारणमीमांसा करताना विद्येचे महत्त्व विशद केले आहे. तद्वतच शेती आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रगत विचार ते 'शेतकऱ्याचा असूड'मध्ये मांडतात. तरीही "मराठी ग्रामीण कवितेची सुरुवात कोणी भा. रा. तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे' या कवितेपासून झाल्याचे सांगतात, तर कोणी चंद्रशेखरांच्या 'काय हो चमत्कार!' या खंडकाव्यापासून. मात्र एकूणच मराठी ग्रामीण कवितेचे अवलोकन केले असता ग्रामीण कवितेची सुरुवात अमक्या एका कवीपासून किंवा कवितेपासून झाली असे निश्चितपणे ठरविता येत नाही. अगदी आधुनिक मराठी काव्याच्या प्रारंभापासूनच ग्रामीण कवितेच्या खुणा मराठी कवितेमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. अर्थात या कवितेचांचे स्वरूप निखळ ग्रामीण म्हणता येत नसले तरी ग्रामीण जीवनचित्रण करण्याची प्रेरणा केशवसुतांच्या काळापासून अनेक कवींच्या मनात कमी अधिक प्रमाणात निर्माण झालेली दिसून येते."[१] असे असले तरी खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण कवितेची प्रेरणा प्रा. गो. म. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे इंग्रजीतील 'Pastoral Poetry' आहे.[२] कुलकर्णींच्या या विधानाला ग. ल. ठोकळांच्या मताचाही आधार मिळतो, "आंग्ल काव्याचें परिशीलन करूं लागल्यावर, बर्नसनें माझ्या मनाची जी पकड घेतली ती कायमचीच."[३] याशिवाय, अनेक मराठी कवींनी वर्डस्वर्थच्या 'The Solitary Reaper' सारख्या कविता लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वतः ग. ल. ठोकळ हे बर्नसपासून प्रेरणा मिळाल्याचे सांगतात. तत्पूर्वी रविकिरण मंडळातील कवी यशवंत यांची दोन जानपद गीते ठोकळांच्या वाचनात आली होती; पण त्यांच्यापेक्षा आपल्याकडे सांगण्यासारखे अज्ञात खूप काही आहे, असे ते म्हणतात. त्यातूनच ठोकळांची 'मीठभाकरी' (१९३८) आकार घेते.

'मीठभाकरी' या संग्रहाच्या पहिल्या आवृत्तीमध्ये ६१ जाणपद गीते असून या संग्रहास वि. द. घाटे यांची प्रस्तावना आणि नगरचे सुप्रसिद्ध चित्रकार डी. एस. गलांडे यांनी रेखाटलेली सुंदर चित्रे आहेत. या कविता १. जानपदगीतें, २. प्रेमगीतें व ३. शिशुगीतें, राष्ट्रगीतें, वगैरे अशी तीन घासांमध्ये विभागलेल्या आहेत. संग्रहाच्या पहिल्या विभागामध्ये २० जानपदगीते, दुसऱ्यामध्ये १७ प्रेमगीते आणि तिसऱ्यामध्ये २४ बालगीते व शिशुगीते आहेत. ठोकळांनी प्रत्येक ठिकाणी 'गीते' हा शब्द उपयोजला असला तरी संग्रहाच्या शीर्षकाखाली कंसात 'स्फुट कवितांचा संग्रह' म्हटले आहे. संग्रहातील पहिली कविता 'शेतकरी' आणि शेवटची कविता 'शिदोरी' आहे. तत्कालीन प्रथेप्रमाणे संग्रहातील प्रत्येक कवितेखाली दिनांक व स्थळ नोंदवलेले आहे. यानुसार या कविता ऑगस्ट १९२७ ते मार्च १९३८ या दहा/अकरा वर्षातील आहेत. कवितांच्या खाली

नोंदवलेल्या स्थळानुसार पुणतांबे, कोल्हापूर, बेलापूर, अकोले, नेवासे, घोडनदी, पुणे, अहमदनगर, बडोदे, मुंबई इत्यादी ठिकाणी लिहिल्याच्या नोंदी आहेत. ही स्थळं पुनरावृत्त होतात. म्हणजेच ठोकळ वेळोवेळी प्रकाशन व्यवसायाच्या निमित्ताने वरील ठिकाणी गेलेले आहेत. ही स्थित्यंतरं काही प्रमाणात या कवितांमध्ये येतात. ठोकळांनी जसे जानपदगीतांमध्ये वास्तव आणले, तसाच रवींद्रनाथ टागोरांनी बंगाली भाषेमध्ये रुजवलेला 'कणिका' हा कविताप्रकारही त्यांनी हाताळला. आणि सुनीत सारखा 'सुनीता' हा सहा ओळींचा काव्यप्रकार मराठीत आणला. त्यांच्या मते, "ज्या कलाटणींमुळे सुनीत या काव्यप्रकाराला सौंदर्य व सौष्ठव प्राप्त झालें आहे, त्या कलाटणीचा अवलंब व्यवस्थितपणें करतां यावा, म्हणून मी सहा ओळींचें बंधन घालून 'सुनीता' लिहावयास सुरवात केली. 'सुनीत'च्या धाकट्या बहिणीला 'सुनीता' नाहीं म्हणावयाचें तर काय?... थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'सुनीत'चा गुलाब, व सुभाषितांची खडीसाखर यांपासून तयार झालेला 'सुनीता' हा गुलकंद आहे."[५]

ग. ल . ठोकळ यांनी प्रथमतःच 'मीठभाकरी'च्या रूपाने सामान्य शेतकऱ्यांचे जगणे मांडले. मजुरांची वेदना अभिव्यक्त केली आणि खेड्यातील गरीब कष्टकरी पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमाचा सहजाविष्कार केला. यामुळे 'मीठभाकरी' हे या संग्रहाचे शीर्षक सार्थ आहे. 'भाकर' हे महाराष्ट्रातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजुरांचे मुख्य अन्न आहे आणि प्रत्येक अन्नपदार्थामध्ये मीठ आवश्यक आहे. मुळात 'मीठभाकरी' हा शब्द सामासिक आहे. त्यामध्ये द्वंद्व आहे. द्वंद्वात्मक समासामध्ये मूळ पदांचा अर्थ न राहता, त्यासारख्या इतर वस्तू व पदार्थांचा समावेश होतो. म्हणजेच 'मीठभाकरी' असे म्हणताना केवळ 'मीठ' आणि 'भाकरी' या दोन पदार्थांचा त्यामध्ये विचार होत नाही, तर यासारख्या अनेक पदार्थांचा अंतर्भाव होतो. ठोकळांची 'मीठभाकरी'मागची भूमिका स्पष्ट आहे. एक - "रविकिरणमंडळ त्यावेळीं क्षितिजावरून नव्या तेजानें वर येत होते. श्री. यशवंत यांचीं एक दोन जानपदगीतें वाचनांत आलीं होतीं. बाळपणचा बराचसा काळ खेड्यांत गेला असल्यानें, मराठी काव्यांतला हा अज्ञात कोपरा आक्रमण करण्याची माझ्या मनानें उचल केली." दोन- "आधुनिक तरुण कवींनीं प्रेमाची बजबजपुरी माजवली आहे, अशा तऱ्हेचे आक्षेप प्रत्यहीं ऐकूं येतात. एकाच चाकोरींतून जात असलेंल्या कविता वाचावयास मिळाल्यामुळें असा आक्षेप घेणारे लोक दोषास पात्र ठरत नाहींत, आणि तारुण्याच्या उन्मादांतली सहजसुलभ भावना प्रेमगीतांखेरीज दुसरीकडे प्रस्फूर्त होत नसल्यामुळें कविवर्गावरही खापर फोडतां येत नाहीं. या पेंचांतून सुटण्यासाठीं माझ्यापुढे एकच मार्ग मोकळा होता. आणि तो म्हणजे समाजांतल्या नीतिबंधनांची फारशी पायमल्ली होऊं न देणारा घरगुती शृंगाराचा. या जगांत ज्या ज्या म्हणून गोड वस्तू आहेत, त्या सर्वांच्या उपमा यापूर्वींच प्रेमाला दिल्या गेल्या आहेत. मी म्हणतो कीं प्रेम हें जीवनांतलें मीठ आहे. साखरेवांचून मनुष्य कांहीं दिवस राहूं शकेल, पण मिठावांचून एक वेळच्या जेवणाला सुद्धां रुची नाहीं. मीठभाकरीच्या शिदोरीची गांठ सोडल्यावर, तुमच्या हाताला पहिला घास जानपदगीतांच्या भाकरीचा लागेल. आणि तोंडाला रुची येण्यासाठीं दुसऱ्या घासांत मिठाची पुरचुंडी ठेवली आहे."[४] म्हणजेच 'मीठभाकरी'मधील गीते रुची वाढवणारी तर तत्पूर्वीची जानपद कविता ही पांचट, बेचव होती असे ठोकळांना निर्देशित करायचे आहे. हे सत्यही आहे. कारण ठोकळांनी तब्बल ३५ कवींच्या कवितांचे संकलन करून 'सुगी' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित केला. मात्र यापैकी बहुसंख्य कवींनी ग्रामजीवन अनुभवलेले नव्हते, तर दुरून पाहिलेले वा कल्पिलेले होते. तसेच या शहरी कवींना खेड्यातील जीवनाचे निटसे आकलन न झाल्यामुळे त्यांनी चुकीचे तपशिलही दिलेले आहेत. कवितेतील ग्रामीण भाषा ही शहरी भाषेची मोडतोड करून उपजवलेली आहे. केवळ हौस म्हणून कविता लेखन केल्यामुळे ग्रामीण जीवनाचे अंतरंग या कवींना पकडता आलेले नाही. त्याचा प्रत्यय तळ्यातला विहार, ढवळ्या पवळ्यांना पाला टाकणे, पिरती, स्मिरती अशा शब्दांतून येतो. शिवाय, या कवितांमध्ये ग्रामीण जीवन आले; पण ग्रामीण मनाचा शोध घेण्यात ही कविता यशस्वी झाली नाही. त्या कवितेला 'मीठभाकरी'ने भेदक केले. परंतु या संग्रहाचे शीर्षक सुरुवातीला

पांढरपेशी होते. कारण 'भाकरी' हा शब्द प्रमाणभाषेतील असल्याचे ठोकळांच्या मित्राने त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दुसऱ्या आवृत्तीपासून या संग्रहाचे शीर्षक 'मीठ भाकर' असे बदलण्यात आले.

ठोकळांपूर्वीच्या कवींनी जे अनुभव विश्व मांडले त्यापेक्षा अधिक वास्तव जीवनानुभव ठोकळांनी मांडले. आज जवळपास नऊ दशकांचा काळ उलटत असतानाही काव्यमयता वगळता ही कविता कालसुसंगत व अधिक प्रत्ययी वाटते. 'शेतकरी' या पहिल्याच कवितेत ते लिहितात की, आकाशाने डोळा उघडण्यापूर्वी म्हणजे सूर्योदय होण्यापूर्वी शेतकरी शेतात जातो, तेव्हा उर्वरित लोक साखरझोपेमध्ये असतात. तो शेतात राबराब राबतो; परंतु त्याचे हाल काही संपत नाहीत. ही स्थिती आजही बदललेली नाही. म्हणून वर्तमानातील महत्त्वाचे कवी इंद्रजित भालेराव शेती आणि शेतकऱ्यांचे महत्त्व सांगत व्यवस्थेला प्रश्न विचारतात,

सांगा माझ्या बापानं नाही केला पेरा
तर तुम्ही काय खाल? धत्तुरा!

असं म्हणायची खरं तर माझी इच्छा नाही
पण माझ्या बापानं आत्महत्या करूनही
आमच्या आयुष्याला तुमची सदिच्छा नाही
तसं असतं तर तुम्ही आमच्या धानाचं मोल केलं असतं[६] ('सांगा माझ्या बापानं')

शेतकरी जगाचा पोशिंदा असूनही आजही या देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती हालाखीची आहे. हीच स्थिती विसाव्या शतकाच्या सुरुवातीला होती, हे ठोकळांच्या 'शेतकरी' कवितेद्वारे प्रत्ययास येते,

पीक काढतो बारमहा हा राबुन शेतावरी
तरी खायला कळणाकोंडा, चिंध्या अंगावरी! ('शेतकरी', पृ.३)

खरं तर, शेतकरी आहे म्हणून जगातील सर्वांना खायला अन्न मिळतं म्हणून भालेराव शेतकऱ्याला सृष्टीचं सहावं तत्त्व म्हणतात,

आकाश माती पाणी उजेड वारा
या ासारखाच शेतकरीही सृष्टीचं सहावं तत्त्व आहे
पण तुम्हाला कुठं त्याचं महत्त्व आहे!
हवापाण्यासारखीच तुम्हाला ज्वारीही फुकट हवी आहे
रोज भाजी ताजी आणि निकट हवी आहे
कारखान्यात ज्वारी पिकत नाही
अन् कारखान्यातला माल तुम्हीही फुकट विकत नाही[७] ('सांगा माझ्या बापानं')

वर्तमानात कवी भालेराव यांनी शेती आणि शेतकऱ्यांचं महत्त्व आणि अस्तित्व मांडले आहे. हेच वास्तव ठोकळांनी विसाव्या शतकाच्या मध्यामध्ये मांडून ठेवले आहे.

'ठेवलेस जर तूं औत तुझें बाजुला
घेतलीस जर तूं उसंत यंदा तुला
मग मिळेल जेव्हां कण न कुणा खायला
बसेल चिमटा, येईल तेव्हां संगळ्यांना समजुन
कीं देशाला तरणोपाय न शेतकऱ्यांवाचुन!' ('शेतकरी', पृ. ३)

शेतकऱ्याकडे प्रचंड क्षमता आहे. तो एका दाण्याचे हजार दाणे करतो. त्याच्याकडे असलेल्या बैल आणि नांगर या साधनांमुळे तो कायापालट करू शकतो. मात्र आजही त्याच्या वाट्याला वंचना, दु:ख आणि दारिद्र्यच आहे. जगातील कारखाने, कंपन्या बंद पडल्या तर प्रत्येकाला जगणे अशक्य होणार नाही; पण शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे उत्पादन कायमचे बंद केले तर विश्वाचा गाडा चालणार नाही. असे असूनही शेतकरी हा कायमच दुष्टचक्रात अडकलेला आहे. कर्जाचा विळखा, सावकाराचे पाश, व्यापाऱ्यांची नीती आणि सरकारी अनास्था ही आज जशी आहे, तशीच पूर्वीही होती. याविषयी ठोकळ लिहितात,

घडोघडीं बदलती रूप त्या मेघांचा भरवसा
आणि त्यांतल्या पाण्याचाही कुणी धरावा कसा!
सावकार सारखा तयावर नांगी उचलुन धरी
सौख्य निरागस चिरावयाला लावितसे कातरी
सरकाराच्या साऱ्याचा गळफास भोंवती पडे
कर्जाच्या चिखलांत गळ्यापर्यंत बिचारा बुडे
...
शेतकरी घालतो तुम्हांला हांक जीव तोडुनी
हात द्यायला तयास नाहीं पुढें येत कां कुणी? ('शेतकरी', पृ. ३)

शेतकरी हा समग्र व्यवस्थेचा आधार असूनही तो सर्वांगाने नाडलेला आहे. शेतकऱ्यांची मुलं शिकली. नोकरी, व्यवसायाला लागली आणि ती परागंदा झाली. निसर्ग आणि शासनाची सतत अवकृपा झाल्याने त्याला सावकाराच्या दारात जाण्याशिवाय पर्याय नसतो. शेती पिकवण्यासाठी घेतलेल्या कर्जातून शेती पिकेलच याची शाश्वती नसते आणि पिकले तरी योग्य भावाने विकले जाईल याची शक्यता नसते. त्यामुळे कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत जातो. याचे समर्पक चित्र 'सावकारी पाश' या कवितेत येते. "गरिबांच्या पालनकर्त्या देवा लौकर धाउन येई!" ('सावकारी पाश', पृ. ३०) अशी देवाच्या हाकेने कविता सुरू होऊन दुसऱ्याच ओळीत संसार संपल्याचे निवेदक सांगतो.

शेत, घर, संसार, गोते
सर्व कांहीं ठीक होते
बेचिराख झाले सगळे देवा !
सावकारिच्या पायीं ('सावकारी पाश', पृ. ३०)

'सावकारी पाश' ही कविता ऑगस्ट १९२८ मध्ये लिहिल्याची नोंद आहे. हा काळ जागतिक महामंदीच्या आरभांचा काळ होता. ऑगस्ट १९२९ ते मार्च १९३१ या काळात महामंदीचा सर्वत्र प्रभाव होता. या मंदीची धग १९२६ पासून जाणवत होती. यापार्श्वभूमीवर 'सावकारी पाश' ही कविता महत्त्वाची वाटते. या कवितेत 'सावकार' हा दुष्टाईचे प्रतीक आहे. सावकारी पाशात पेशवेदेखील अडकले होते. याच सावकारशाहीमुळे डेक्कनचा उठाव झाल्याचा इतिहास आहे. "राहण्याला चंद्रमौळी / झोपडी होती निराळी" असे सर्वकाही सुखेनैव सुरू असताना कर्जामुळे विशेषत: सावकारी कर्जामुळे धान्य देणारी काळी आई सावकार ताब्यात घेतो तेव्हा निवेदक देवाला थेट प्रश्न करतो की, देवा, तू पालनकर्ता आहेस, मग या अन्यायापुढे गप्प का आहेस? तेव्हा तो एका अर्थाने धर्मव्यवस्थेला आव्हान देतो.

'शेतकरी', 'सावकारी पाश' या कवितांप्रमाणेच 'सुगी', 'मोटेवरलं गाणं', 'गरिबीचा पाहुणचार', 'घरधनी' इत्यादी कवितांमध्ये कृषीवलांचे वास्तव चित्रण आहे. तसेच शेतकरी, शेतमजूरांचे आणि त्याच्या कष्टाळूपणाचे अतिशय बारकावे ठोकळांनी मांडले आहेत. त्यांची प्रत्येक कविता ही एक कथन आहे. त्या कवितेची भाषा साधी, गद्यमय, ओबडधोबड असली तरी ही कविता चित्रदर्शी आहे. त्यामुळे प्रत्येक कविता वाचताना वाचकांच्या डोळ्यापुढे घटना, प्रसंग, ती व्यक्ती उभी राहते.

जाडीभरडी वाकळ दिसते याच्या खांद्यावर
बोलत आपुल्या बैलांसंगें चालतसे भरभर
दिसतो हा अंगाने राकट अन् रंगाने सावळा
कमरेला खालतीं विळा, अन् वर गंधाचा टिळा; (*'शेतकरी'*, पृ. २)

शेतकऱ्याने घाम गाळल्याशिवाय लोकांना अन्न मिळत नाही; पण घाम गाळूनही त्याच्या पोटाला अन्नही मिळत नाही, ही या व्यवस्थेत शोकांतिका आहे. प्रचंड कष्ट करूनही त्याला खस्ता खाव्या लागतात. याला कारण केवळ शासनाची उद्योग, व्यवसायधार्जिणी धोरणे होत. परिणामी त्याच्या, त्याच्या लेकरांच्या अंगावर निट कपडे नसतात. शेतात राबराब राबून ताटात कळणाकोंडाच असतो. एकीकडून सावकार आणि दुसरीकडून सरकार यांच्या कचाट्यात सापडलेल्या या शेतकऱ्याला मदतीचा हात कोण देणार? असा प्रश्न कवी करतो. कृषीव्यवस्थेतील दुसरा अविभाज्य घटक असलेल्या मजूरांचीदेखील शेतकऱ्यांप्रमाणेच दैन्यावस्था असते. पूर्वी मजूर तांबडं फुटायच्या आत कामाला जुंपले जात. अतोनात कष्ट करूनही त्यांना खायला पोटभर भाकरी नाही की अंगभर कपडे नाही. अशा स्थितीत त्यांना आयुष्य कंठावे लागते. त्या काळात मजुरांची गुलामांसारखी अवस्था होती, त्यामुळे कवी म्हणतो,

हे जिणें असे मजुरांचे　　बैलावाणी राबावें
लागता भूक पोटाला　　मातीचे घास गिळावे
कंठाला कोरड पडतां　　अश्रूंचे पाणी प्यावें
मातींत अंग टाकावें　　गारठ्यामध्यें झोपावें;
कुचराई कांही नसतां　　बोलणीं तडातड मिळती
पेकटांत बसती लाथा　　चाबूक फडाफड उडती
लागून उन्हाच्या झळया　　रक्ताचे ओघळ सुकती (*मजूर,* पृ. ३२)

येथे कवीने सुरुवातील मजूर आणि बैल यांच्यातील समानता दर्शवली आहे. मजूर आणि बैल दोघांना काबाडकष्ट करावे लागतात. बैल निसर्गत:च मूक आहेत; पण मजुरांना आवाज असूनही बोलता येत नाही. म्हणजेच तत्काळात मजुरांवर पाशवी अत्याचार केले जात होते. हीच दाहकता कवीने 'मातीचे घास, अश्रूंचे पाणी, गारठ्यात झोपणे' इत्यादीद्वारे निर्देशित केली आहे. या दाहकतेला उन्हाच्या झळयामुळे रक्ताचे ओघळ सुकणे या ओळीने अधिक गडद केले आहे. कवितेच्या शेवटी "हा जीव कसा कंठावा? सोडीव यांतुनी देवा!" असे म्हटले आहे. येथे ग्रामव्यवस्थेतील शेतकरी, शेतमजुरांची हतबलता प्रत्ययास येते. या संग्रहातील अनेक कवितांमधून वारंवार देवशरणता प्रकट झाली आहे. विशेष म्हणजे या ओळींनी कवितांचा शेवट होतो. उदा. "कोणता देवाजिचा हेतू असावा नाकळे!" (९), "देवाजीचं नांव घेनी चालूं भरभर." (१२), "कवाशिक याल माझ्या देवाच्या बी देवा?" (२९), "भलें करिल देवाजी तुमचे, टाका दुरुनी दाणे!" (३६) इत्यादी.

ग्रामव्यवस्था ही जशी पांढरी आणि काळीमध्ये विभागलेली असते. तसेच या व्यवस्थेमध्ये कमीअधिक प्रमाणात अठरापगड जाती असतात. या जातींनी ग्रामव्यवस्था आणि कृषीव्यवस्थेच्या उभारणीमध्ये हातभार लावलेला असतो. या जाती समाजाचा अविभाज्य भाग असतात. त्यांचे चित्रण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कवितेत आलेले आहे. सोबतच सामाजिक रीतिरिवाज, प्रथा-परंपरा आणि सुख-दु:ख आदींचे दर्शन या कवितांमध्ये घडते. ग्रामव्यवस्थेमध्ये गावकुसाबाहेर असलेल्या घटकाचेही चित्रण येते. 'मूठभर दाणें' ही अशीच एक कविता. गावगाड्यात मांग समाजाला अंगण झाडणे, केरसूणी तयार करणे, चऱ्हाट-कासरा तयार करणे वगैरे अतिशय हलकी कामे दिली जातात. त्यांच्याकडून घेतलेल्या वस्तूंच्या बदल्यात त्याला फाटलेल्या चिंध्या, शिळ्या भाकरी, उष्टे अन्न दिले जात असे. एकूणच या समाजाची हालाखीची स्थिती आणि अस्पृश्यता या दोहोंचे चित्रण या कवितेत येते.

चिंध्यमांध्या द्या मज, फिरतो मी उघड्या अंगाने
गोड धोड जर केलें तर, मज ठेवा उष्टी पानें
शिळा नि पाका भाकरतुकडा फेकुं नका रस्त्यानें
कुटक्यासाठीं कच्चींबच्चीं बघती केविलवाणे
नका थांबवूं रखडत मजला, भुजती पाय उन्हानें
भलें करिल देवाजी तुमचे, टाका दुरुनी दाणे !(*मूठभर दाणे,* पृ. ३६)

एकीकडे मांग समाजाची वरीलप्रमाणे स्थिती होती, तर दुसरीकडे सवर्ण असलेला मराठा समाज याच प्रकारचे जीवन व्यतीत करीत होता, तोही मराठी स्वराज्यामध्ये चाकरी करीत होता, असे चित्र 'मराठा' या कवितेत येते-

पोटास ज्याच्या मिळे एक वेळा सुकी कोरडी खायला भाकरी
केली इमानास जागून ज्यानें मराठी स्वराज्यामधें चाकरी
ज्याला रहायास साधीसुधी ती, असे खिंडखोऱ्यामधे झोंपडी
हातावरी घेउनी मस्तकाला रणीं झुंजला तो मराठा गडी ! (*मराठा,* पृ. ९२)

मराठा, मांग या जातींच्या सूक्ष्म चित्रणासोबतच प्रेमभावनेचेही अतिशय प्रभावी चित्रण केले आहे.

'मीठभाकरी'चे मुख्य सूत्र शेती, शेतकरी आणि ग्रामव्यवस्थेतील घटक, त्यांचे कष्ट, त्यांची स्थिती आदींचे दर्शन घडवणे असले तरी या घटकांच्या आयुष्यातील अलवार प्रेमभावनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. यामुळे या संग्रहात 'प्रेमगीतां'चा दुसरा घास आहे. "प्रेम हे जीवनांतलें मीठ आहे." या जाणिवेतून ठोकळ प्रेमाकडे पाहतात. परंतु 'आधुनिक तरूण कवींनी प्रेमाची बजबजपुरी माजवली' असल्यामुळे प्रीतभावनांचे आविष्करण करताना ते स्वत: 'समाजातल्या नीतिबंधनांची फारशी पायमल्ली होऊं न देणारा घरगुती शृंगार' अभिव्यक्त करत असल्याचे म्हणतात. यामुळे या कविता शरीर विप्रलंभ पातळीवर जात नाहीत. या विभागाच्या सुरुवातीला ते एका तरुणाच्या स्वप्नातील आदर्श प्रेयसी साकारतात. तद्वतच स्थलांतरामुळे प्रेमातील विरहवेदना मांडत नात्यातील दुरावा आणि जवळीक तितकीच महत्त्वाची असल्याचे सांगतात. प्रेमगीतांमध्ये 'अर्धांगी', 'रेशमाची गाठ', 'सासरीं', 'तू', 'बदामाची राणी', 'शरणचिठी', 'तिच्याविषयीं', 'तिचें पत्र', 'कांटा', 'स्वातीचे थेंब', 'शोध', 'उशीर', 'अनुनय', 'एकटी', 'तुझ्या खातर', 'दुर्भांकुर', 'सुनीता' या कवितांसोबतच अन्य विभागातील 'जात्यावरलं गाणं', 'तुझ्याबिगर', 'आंब्याच्या झाडाखाली' इत्यादी कवितांचा समावेश होतो.

"एखाद्या सुसंस्कृत व रोमँटिक अविवाहित तरुणाला जर, 'तुला कशी बायको हवी? असें विचारलें तर तो म्हणेल-" या प्राक्कथनापासून 'अर्धांगी' या प्रेमगीताची सुरुवात होते. एक स्वप्न सुंदरी कशी? तर नाजूक, कोवळी, गोरी, सडपातळ, सडसडीत बांधा, आवाजात माधुर्य, बोलकी, कलाप्रेमी, रूपवंत, विनयशील आणि गुणी असावी. तिच्या सर्वगुणसंपन्नतेमुळे वारसही त्याच प्रकारचा मिळेल असे तरुणाच्या मनातील 'अर्धांगी'चे स्वप्न रंगवले आहे. तर 'रेशमाची गांठ' या कवितेत प्रेमभंगाचे दु:ख आहे. परंतु तिच्या विवाहापश्चात तिला वैधव्य येते तेव्हा निवेदक तिच्यासोबत नव्याने संसार करण्याचे बोलतो,

एकलीच कां आयुष्याचा चढसी डोंगरघाट?
प्रेम मजवरी नाहीं म्हणुनी
सांग बरें मज शपथ घेऊनी
चल तर लवकर हा कर धरुनी
पाप न याच्यामधें, ठेविली धर्मानें पळवाट
फुलासारखें ठेविन तुजला
फोड जणूं तळहातावरला
सुरवात करूं संसाराला

तुझ्या नि माझ्या जीवांची चल बांधूं रेशिमगांठ !

समोर सुखी आयुष्याची स्वप्न असताना तारुण्यातच तिला वैधव्य येते. तिच्या वाट्याला एकाकीपणाचे दु:ख येते. हे दु:ख प्रियकर असलेल्या निवेदकाला साहवत नाही, म्हणून तो तिला आपण दोघे नव्याने आपल्या जीवांची रेशिमगाठ बांधू, संसार सुरू करू असे म्हणतो. येथे त्याच्यातील उदात्त प्रेम आणि त्याच्या आधुनिक, पुरोगामी भूमिकेचा प्रत्यय येतो. तद्वतच स्त्रीच्या जीवनाचाही विचार येतो. ठोकळांची स्त्रीविषयक भूमिका ही आदराची, सहवेदनेची आणि माणूसपणाची आहे. माहेरी श्रीमंती असलेल्या तिचा जेव्हा गरीब कुटुंबात विवाह होऊन ती 'सासरी' (याच्या घरी) येते, तेव्हा तो दोन कुटुंबातील संपन्नतेची तुलना करत खरे प्रेम/सुख गरिबीतच असल्याचे म्हणतो, "विभवांत खरें सुख नाहीं/ गरिबींतच कळुनी येई प्रेमाची माधुरी.". (पृ. ४३).

ठोकळ हे खेड्यातील असल्याने त्यांनी गावातील पती-पत्नी, त्यांचे प्रेम जवळून पाहिलेले होते. त्यामुळे सांसारिक जीवनातील बारकावे त्यांनी उत्तमप्रकारे टिपले आहेत. खेड्यात तत्काळात एकत्र कुटुंब पद्धती होती. कुटुंबातील ज्येष्ठांचा आदर, दरारा, परंपरा आणि संस्कार यामुळे पती-पत्नींना एकमेकांसमोर प्रेम सहज व्यक्त करता येत नाही. तेव्हा विविध कामांच्या निमित्ताने एकमेकांच्या जवळ येऊन, लपूनछपून प्रेम व्यक्त करावे लागते. किंवा शेतात काम करताना एकमेकांना भेटण्याची, बोलण्याची संधी शोधली जाते. उदा.

वावरून ऐशी नकोस मागं फिरू
चल येकाम्होरी बसून जेवण करू
या इठं पघाया न्हाई चिटपाखरू (*आंब्याच्या झाडाखालीं,* पृ. २०)

खरं तर, या कवितेत भर उन्हाच्या प्रहरात ती भाकरी घेऊन येते तेव्हा शेतात केवळ दोघे आहेत. एकांत आहे आणि 'जेवणे, पाणी पिणे, झोपणे' वगैरे शब्दांचा वाच्यार्थापलीकडे जाऊन लक्षार्थाने विचार केला तर शरीरशृंगार प्रकटतो. 'जात्यावरलं गाणं' या कवितेत पती कामासाठी दूर गेला आहे आणि पत्नीला त्याची आठवण होते तेव्हा तिला त्याची काळजी वाटते. "दूरदेशी गेला मला एकली टाकून / तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोन" असं ती मैत्रिणीजवळ व्यक्त करू शकते; पण त्यापलीकडे जाऊन तिच्या मनात काही भाव आहेत-

राया डोळ्यामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
राया तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठी मला जनूं भरलया खूळ
तुझ्याबिगर रे ! मला घासही जाईना
तुझ्याबिगर रे ! मला पाणीही घोटना
कवाशिक याल माझ्या कुडींतल्या जीवा ?
कवाशिक याल माझ्या देवाच्या बी देवा ? (*जात्यावरलं गाणं,* पृ. २८-२९)

या भावना ती फक्त जात्याजवळच व्यक्त करते. एकीकडे पती दूरगावी गेल्याने पत्नीला पतीची आठवण येते. तर दुसरीकडे पत्नी जास्त दिवस माहेरी राहिल्याने पतीचीसुद्धा घालमेल होते. त्याला तिच्याशिवाय राहवत नाही, त्याला ती, तिचा सहवास हवाहवासा असतो. तेव्हा तो शेतीच्या कामाचा बहाणा करून तिला बोलावतो.

"तुझ्याबिगर तण
सांग निं दिल कोण ?
झाली पिकाची गं धुळधाणी !
जिव पस्तावला
कारभारणी तुला
अगं माहेरी धाडुनशानी !" (*तुझ्याबिगर,* पृ. २५)

कधी ती सहमतीने खूप दिवसांसाठी माहेरी गेलेली असते तर कधी रूसून माहेरी गेलेली असते. दोन्ही परिस्थितीत त्याला तिच्या अस्तित्वाची जाणीव होते, तेव्हा तो तिला 'शरणचिठी' लिहितो. तिने परत यावे यासाठी विनविण्या करतो. ती संसारातील 'लक्ष्मी' आहे. तिच्याशिवाय त्याचे आणि त्याच्याशिवाय तिचे अस्तित्व निरर्थक आहे याची जाणीव अनेक कवितांमधून प्रकटते. तिसऱ्या 'शिशुगीतें, राष्ट्रगीतें, वगैरे' या विभागात निरागस बालविश्वासोबतच शौर्य, देशभक्ती आणि राष्ट्राभिमानाचे चित्रण येते.

'मुलें आणि फुलें' ही कविता प्रसिद्ध गुर्जर कवी श्री. रा. रा. ललितजी यांच्या 'बालके अन् फुले' या कवितेचा अनुवाद आहे. मुले आणि फुले दोन्ही समान आहेत, दोन्हींमध्ये फरक नाही, असे कवी म्हणतो. या लहान मुलांची स्वर्गाविषयीची कल्पना 'स्वर्ग' कवितेत येते. शाळेसाठी घरापासून दूर राहिल्यानंतर मुलाच्या अस्वस्थ मनाची स्थिती 'घरीं' या कवितेत येते.

"या शाळेसाठीं अंतरलों मी घरा
सोडला घराचा मी माझ्या उंबरा
कंटाळुन गेलो या शहराला पुरा
हा जीव झाला येथे टांगल्यापरी
जाईन कधी मी आतां माझ्या घरी ?" (*घरीं,* पृ. ८२)

या शहरात स्वर्ग लाभला तरी घरच्या मंडळींपासून दूर राहणे त्याला नको आहे. त्याचा आनंद गावाकडे घरातील आई, बाबा, ताई यांच्यासमवेत आहे. शिवाय ओढा, लव्हाळी, झोपडी, तुळशी वृंदावन, गप्पा गोष्टी, भांडणं यातच खरे स्वर्गीय सुख आहे, असे तो म्हणतो. म्हणजेच शेती, माती आणि निसर्ग हा ठोकळांच्या गीतांचा आत्मा आहे. त्यांच्या कवितेत वरवरचे निसर्गचित्रण येत नाही. खेड्यातील माणूस आणि निसर्ग यांची एकमेकांशी जोडलेली नाळ, त्यांच्यातील अतूट संबंध प्रस्तुत कवितेत येतात. यामध्ये 'मोटेवरलं गाणं', 'गुराख्याचा पोरं', 'पहाट', 'रात्र', 'उन्हाळा' इ. कवितांचा समावेश होतो. 'पहाट' या कवितेत पहाटेचे निसर्गसौंदर्य आहे. तारा फिक्या झाल्या आहेत. डोंगर उजळून निघत आहे. रानातली पाखरे आनंदाने गोड

किलबिल करीत आहेत. वाऱ्याच्या झुळकीने अंगाला कापरे येत आहे. काही घरांमधून जात्याचा आवाज आणि मंजुळ गाणेही ऐकू येत आहे आणि त्या गाण्याला साथ म्हणून कोकीळाही गात आहे असे विलोभणीय चित्रण प्रस्तुत कवितेत येते.

मोत्यांचे सर ओघळून पडती, ओलावती हिर्वळ
गेला मोहरुनी पुरा फुलवरा, झाला सुरू दर्वळ,
जातें चालतसें कुठें घरघरा, आवाज ये मंजुळ
निंबोणीवरती बसून करिते त्या साथ ही कोयळ; (*पहाट,* पृ. १०६)

अशा या मनमोहक, प्रसन्न सकाळी बैल हाकीत शेतकरी शेताकडे निघालेला आहे, मजूर पोटासाठी घाम गाळायला लागला, कुऱ्हाड घेऊन मोळीविक्या मोळी आणण्यासाठी निघालेला आहे आणि शेळक्या मेंढ्या घेऊन हळूहळू रानामध्ये चालला आहे. ही गावाकडची रम्य सकाळ आणि तेवढेच सुमधुर असलेले नातेसंबंध आणि माणुसकी जपणारी माणसं हे ग्रामव्यवस्थेचे अलौकिक वैशिष्ट्य आहे. गावात, दारावर कोणी मागतकरी आला किंवा अनोळखी असला तरी त्याला रिकाम्या हाती आणि उपाशी पोटी न जाऊ देणारी ग्रामसंस्कृती. या संस्कृतीचे सुंदर चित्रण 'मीठभाकरी'मध्ये आले आहे.

या बसा पाव्हनं असं, रामराम घ्या !
कोनच्या तुम्ही गावचं ? गाठुडं तिठं राहुद्या !
घोंगडी टाकली इठं, बसा तीवर
अनमान करु नका आता, हे समजा अपुलं घर (*गरिबीचा पाहुणचार,* पृ. २१)

एखाद्या अनोळखी पाहुण्याला आत्मीयतेने घरी बोलावणे, त्याची आस्थेवाईकपणे चौकशी करीत त्याला अंघोळीला पाणी टाकणे, 'मीठ भाकर' का होईना पण आदराने खायला देणे. तो पाहुणा जायला निघला की-

'जायचं' काय म्हणता? झोप घ्या जरा
जाताल उद्या, का घाई? छे, बेत नव्हं हा बरा ! (*गरिबीचा पाहुणचार,* पृ. २२)

हे चित्र शहरात दुर्मीळ आहे; पण हल्ली खेड्यापाड्यातही असे चित्र दिसत नाही. गत शंभर वर्षात खेडे, खेड्यातील जीवन आणि शेतीमध्ये अमुलाग्र बदल झाले असले तरी शतकापूर्वीचे ग्रामजीवन, कृषीजीवन तत्कालीन मराठी समाज आणि संस्कृती समजून घेण्यासाठी ही कविता महत्त्वाची आहे.

'मीठभाकरी'मधील कविता गद्यवजा असली तरी या कविता प्रसंगनिष्ठ आहेत. कवी एखादा प्रसंग घेऊन त्या संदर्भाने निसर्ग चित्रण, भावना, विचार, कल्पनांना शब्दरूप देतो. ठोकळांचा पिंड कथालेखनाचा असल्याने ही कविता कथनात्मक, नाट्यात्मक आहे. विशेष म्हणजे या कवितांपैकी बऱ्याच कविता आत्मनिवेदनात्मक आहेत. कवितेतील निवेदक अनेक घटना, भावना व जीवनानुभवाचे स्वतःच कथन करतो. त्यामुळे ही कविता जिवंत वाटते. कवीचे हे फार मोठे कौशल्य आहे. तद्वतच ठोकळांनी 'मीठभाकरी'मध्ये कवितेऐवजी गीत म्हटले आहे. या गीतांची रचना विविध छंद व वृत्तांमध्ये आहे. यामध्ये भूपाळी

('शेतकरी', 'मुलें आणि फुलें', 'स्वर्ग'), सुनीत ('कांदाभाकर', 'कष्ट आणि विश्रांति', 'तूं', 'बदामची राणी', 'पहाट', 'बकुळीची फुलें'), शार्दूलविक्रीडित ('गुराख्याचा पोर'), पाडव-गझल ('खेडवळ फूल'), मुद्रिका ('मायघर', 'लक्ष्मी', 'गरिबीचा पाहुणचार', 'तिचें पत्र'), शार्दूलविक्रीडित ('गुराख्याचा पोर'), केशवकरणी ('मोटेवरलं गाणं', 'आंब्याच्या झाडाखालीं', 'घरधनी'), अक्रूर ('पावसा!', 'भिकारीण'), ओवी ('जात्यावरलं गाणं'), सारंगीवाला ('सावकारी पाश'), राजहंस ('मजूर'), कोकिळा ('रेशमाची गांठ', 'शरणचिठी', स्वातीचे थेंब', 'शारदेस'), मदारमाला ('तिच्याविषयीं', 'मराठा'), गझल-मदालसा ('कांटा', 'बंदिवान'), वसंत-गझल ('शोध'), दिंडी ('घराकडे', 'पोट'), मोहिनी ('आईचें दूध'), पंचचामर ('रात्र'), भिल्लीण-गझल ('पन्हाळगड', 'उन्हाळा'), गझल ('आशा') इ. शिवाय अनेक गीतांना तत्कालीन सुप्रसिद्ध गीतांच्या चाली दिल्या आहेत. विशेष म्हणजे ठोकळ यांनी छंद व वृत्तांची निवड हेतूपर्ण केलेली आहे. ते पहाटेसाठी भूपाळी, प्रेमासाठी व श्रमासाठी सुनीत, वीरभावनेसाठी मंदारमाला वृत्ताची निवड करतात. लोकछंद आणि संस्कृत वृत्त एकत्र वापरणे हे त्यांच्या काव्यातील लोक-शास्त्र संगमाचा उत्तम नमुना आहे.

ग. ल. ठोकळ यांची भाषाशैली ही ग्रामीण व नागरी अशी संमिश्र आहे. नागरी भाषेतील शब्द कवितेत येत असले तरी कवीची भाषा ग्रामीण आहे. शब्दसंग्रह ग्रामीण आहे. प्रत्येक प्रसंगांमध्ये त्या-त्या व्यक्ती कशा बोलतील याची त्यांना अनुभूती असल्यामुळे कवितेतील संवाद, प्रसंग चपखल आहेत. "झुणकाभाकर खाउन लौकर व्हारं तय्यार" ('खळ्यावर'), "हें गच्च दाटलं पीक वावरामधीं/ फलवरा असा कणसांना तरतरला नव्हता कधीं/ हंतरली भुइवर जशी हरळ लसलशी" ('लक्षुमी'), "झुंजूमुंजू झालं, सुकदेव वर आला/ पहाटचं वारं कसं झोंबतं अंगाला" ('जात्यावरलं गाणं') या वाक्यांद्वारे भाषेतील सहजता जाणवते. तसेच अवंदा (यंदा), इरभळ (दिवसभर), कोंबडसाद, औसरी (क्षणी), मारगेसर (मार्गशीर्ष), बिगीनं (लवकर), निचितीनं (शांत), झांजड (संध्याकाळ), केधूळ (कधीपर्यंत), गोते (वंश), इठं (येथे), मायंदळ (खूप), गुळचट (गोड), अपरूक (कौतुक), वठ (ओठ), खंडोगणती, झुंजुरकें, खोंगळी इत्यादी विशेष शब्द येतात. तर न्याहरी, झळया, बुंधा, गारठा, शिवार, शेकोटी, गुन्हाळ, खळे, फुलवरा, हरळ, मसेट, थारोळं, दंड, वाफ, साबरफणी, दावण, झगर पेटवणे, शिवळाट, गाठुडं, निंदणे, भुई, परभारा, वैरण काडी, परस, पारुसं, देवळी, राया, कुसंबी, अंबेराई, झोपडी, दळिंदर, गुरं, बोंडे, निऱ्ही, माळवं, धनंतर, आगटी, खोपटी, चुंबळ, परस, अवस, विंझणवारा, सडारांगोळी हे सारे शब्द बोलीभाषा व ग्रामसंस्कृतीमधील आहेत. तसेच मेघ, मार्तंड, अंबर, नयन, अंबरी, अग्र, गगनीं, अलगूज, कांचण, कुंज, धारोष्ण, चंद्रमौळी, विलसे, शशी, शुभ्र, दर्भांकुर, मृग, ओष्ठसंपुटी, रजनी, चंद्रमा, अहर्नीश इत्यादी संस्कृत शब्द आहेत. येथे बोलीसोबतच तत्सम, तद्भव, बोलभाषा/अपभ्रंश असा सुवर्ण मिलाफ आहे.

कालदर्शक : रामपहारी, साखरझोप, दिवेलागण, पहाट, अवंदा (यंदा), इरभळ (दिवसभर), कोंबडसाद, औसरी(क्षणी), मारगेसर, बिगीनं (लवकर), निचितीनं (शांत), झांजड (संध्याकाळ), केधूळ (कधीपर्यंत), गोते (वंश), पाणकळा, खंडोगणती, झुंजुरकें, इठं (येथे) इत्यादी.

वस्तू : वाकळ, विळा, कुडते, लंगोटी, बाल्यीं, कांबळ, बांसरी, गोफण, कणगी, पोतीं, मडके, उतरंड, चुलखंड, खाट, रानशेण्या, कडबा, सरमाड, कुड, पोहरा, कासरा, शिसं, औत, गोफण, माची, कोळपन, चिलीम, पाटी, खाट, जातं, पणती, पागूटं, मंगळसूत्र, बांगड्या, कुंकू, साबण, सुई, साडी, कोयती, परडी, गाद्या, बेड्या, कांबळ, अंगठी, मांडव, बाम, मच्छरदाणी, झोळी, झोका, सोने, संगीनी, कांचन, तिरकमठा, मुरली इत्यादी.

अन्नधान्य/पदार्थ : भाकरी, कळणाकोंडा, चटणी, ज्वारी, हरबरा, गहू, खडीसारखर, आमटी, भाकरी, हुळा, झुणकाभाकर, शाळू, हळद, जोंधळं, वंब्या, चिंच, हुरडा, कांदा, बेसन, चटणी, तमाखू, मिठमिरची, तांदूळ, रोटी, विडा, चुना, वारुणी, तूप, पीठ इत्यादी.

पशुपक्षी : बैल, नांगर, मेंढरें, गाई, म्हशी, कोंबडं, कोकिळा, कोल्हे, वाघिण, बहिरससाणा, मृग, पारधी, चित्ता, बिबा, घूकवाघळें इत्यादी.

झाडी/वेली/वृक्ष : आंबा, निवडुंग, पिंपळ, केकताड, केकती, लिंबू, वेत, तारू, जास्वंद, सफरचंद, जांभुळ, द्राक्ष, नागवेल, पारिजात, काकडी, तुळशी कारले, केवडा, मेथी इत्यादी.

शेती, निसर्ग व ग्रामजीवन : खोंगळी, न्याहरी, ओढा, मळा, झळया, बुंधा, गारठा, शिवार, शेकोटी, गुऱ्हाळ, खळे, फुलवरा, हरळ, विहीर, मसेट, थारोळं, दंड, वाफ, साबरफणी, दावण, झगर पेटवणे, शिवळाट, गाठुडं, निंदणे, भुई, परभारा, वैरण काडी, परस, पारुसं, देवळी, राया, कुसंबी, अंबेराई, झोपडी, दळिंदर, गुरं, बोंडे, निऱ्ही, माळवं, धनंतर, शेण, आगटी, खोपटी, चुंबळ, परस, अवस, विंझणवारा, शिव, सुरपारंब्या, शिदोरी, सडारांगोळी इत्यादी.

रंगदर्शक : ढवळे, सफेत, तांबडा, केशर, लाल, तांबूस इत्यादी.

व्यक्ती/नाते : करवली, कारभारीण, घरधनी, सावकार, मालकीण, मालक इत्यादी.

शरीरावयव : छाती, खांदा, दात, वक्षस्तटी, कंबर, डोळे, कमर, पोट, नरडे इत्यादी.

जाती : मराठा, मांग, वाणी, ब्राह्मण, शेळक्या, मोळीविक्या, पारधी इत्यादी.

कवी ग. ल. ठोकळ यांच्या 'मीठभाकरी' मधील ६१ कवितांमधून ग्राम व कृषी संस्कृतीतील वरीलप्रमाणे अनेक शब्द आले आहेत. यापैकी बहुसंख्य शब्द वर्तमानात अपरिचित असतील. हे शब्दांचं संस्कृतीचं आणि ज्ञानाचं संचित ही कविता पुढील पिढीपर्यंत घेऊन येते. यामुळे 'कवी भाषेचा गर्भ जिवंत ठेवण्याचं काम करतो' या प्रा. दिलीप चित्रे यांच्या विधानाचा येथे प्रत्यय येतो. या कवितेत स्प्रिंग, ब्येस, टॉवेल, गुडनाइट, पॉपिया, पोष्टमन, हॉर्न यासारखे इंग्रजी शब्द येतात. कवितेतील बहुसंख्या प्रतिमा या ग्रामीण जीवनातून येतात; पण त्या वैश्विक भावनांना स्पर्श करतात. या सगळ्या प्रतिमा काळ्यामातीशी संबंधित असल्या तरी त्यातून प्रकट होणारे श्रम, प्रेम, विरह, आनंद, वेदना हे भाव सार्वत्रिक आहेत. मात्र काही ठिकाणी ठोकळांनी शब्दांची/भाषेची मोडतोड केलेली आहे. काही ठिकाणी चुकीचे संदर्भ येतात. उदा. बैलांना चुचकारणे, अरधी, नाहुनी, हंबारून, पघाया, फुंफाटा इत्यादी. तर 'जात्यावरलं गाणं'मध्ये "झुंजूमुंजू झालं, सुकदेव वर आला / पहाटचं वारं कसं झोंबतं अंगाला / परसांत माझ्या आरवतंय कोंबडं / लई वक्त झाला, आता फुटंल तांबडं" (पृ. २८) वगैरे.

थोडक्यात, 'मीठभाकरी' हा कवितासंग्रह प्रकाशित होऊन आता जवळपास नव्वद वर्षे उलटत आहेत. तो काळ, त्या काळातील कविता, कवितेची भाषा, आशय, विषय, विचार आणि वाङ्मयीन पर्यावरण लक्षात घेता ठोकळांची कविता संख्यात्मक नाही, तर गुणात्मक आहे. "शेतकरी, खेड्यातील पती-पत्नी व प्रियकर-प्रेयसी प्रेम, खेडे-शहर तुलना, खेडेगावाचे वर्णन, सांस्कृतिक विशेष, खेड्यातील जाती-जमाती हेच समकालीन ग्रामीण कवींच्या कवितेत आलेले विषय ठोकळांच्या कवितेत दिसतात. मात्र या विषयांतही ठोकळांच्या कवितेचं वेगळेपण असं की, त्यांच्या कवितेत ग्रामीण जीवनाबद्दलचं अवास्तव बेगडी वर्णन नाही किंवा माहिती आणि तपशिलाच्या बाबतीत पटकन नजरेत भरतील असे दोष सहसा नाहीत."[८] त्यांनी विविध विषयांचे न्याय्य चित्रण केले आहे. शेतकरी दुर्बल नाही तर तो देशाचा आधार आहे. तसेच मजूर लाचार नसून तो व्यवस्थेचा बळी आहे. स्त्री केवळ श्रम-शृंगारापुरती नाही तर ती एक जिवंत व्यक्ती आहे. भिकारीण करुण नाही तर ती एक माता

आहे. या दृष्टिकोनामुळे ही कविता अधिक उंची गाठते. शिवाय, वर म्हटल्याप्रमाणे ठोकळांनी केवळ अन्य कवींचे, कवितेच्या रूपबंधाचे अनुकरण केले नाही तर 'सुनीत'सारखा 'सुनिता' हा काव्यप्रकार मराठीला दिला. त्यांनी काव्याभिव्यक्तीमध्ये विविध छंद व वृत्तांचा केलेला स्वीकार, संमिश्र भाषा आणि आशयातील सामाजिक व सांस्कृतिक जाणीव या सर्वांमुळे 'मीठभाकरी' सामाजिक व सांस्कृतिकतेबरोबरच काव्यशास्त्रीयदृष्ट्याही रूचकर ठरते. विशेष म्हणजे खेड्यापासून तुटल्यामुळे मनाची होणारी घालमेल या कवितेत प्रामाणिकपणे येते. म्हणून हा संग्रह मराठी साहित्याच्या कपाटात धुळीत पडून राहण्यास पात्र नाही तर त्याची नव्या पिढीला ओळख व्हायला हवी, यासाठी केलेला हा अट्टाहास.

संदर्भ :

१. सार्वेकर, कैलास. *मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास.* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती : ऑक्टोबर, १९९९/ पुनर्मुद्रण : जुलै, २०१७, पृ. १.
२. यादव, आनंद. *ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या.* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस, दुसरी आवृत्ती : १९९४, प्रस्तावना, पृ. चार.
३. ठोकळ, ग. ल. *मीठभाकरी.* पुणे : हनुमान प्रेस, एप्रिल १९३८, शिदोरी सोडण्यापूर्वी-, पृ. ३.
४. कित्ता, पृ. ३-४.
५. कित्ता, पृ. ३-४.
६. उमरीकर, श्रीकांत. पगार, एकनाथ (संपा.). *सारे रान : इंद्रजित भालेराव यांची समग्र कविता.* परभणी : जनशक्ती वाचक चळवळ, प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २०१६, पृ. २६७.
७. कित्ता, पृ. २६७.
८. सार्वेकर, कैलास. उनि, पृ. ६१.
९. https://ia801509.us.archive.org/33/items/in.ernet.dli.2015.484491/2015.484491.Mithbhakar.pdf